# राज्यशास्त्र विभाग
## शैक्षणिक वर्ष 2021- 22 अहवाल

26 जून छत्रपती राजर्षी शाहू महाराज जयंती निमित्त हुतात्मा राजगुरू महाविद्यालयात राज्यशास्त्र विभागा अंतर्गत छत्रपती राजर्षी शाहू महाराज यांचे विचार आणि कार्य या विषयावर सकाळी 10.00 वा. zoom या प्लॅटफाॅर्मवर प्रा.डॉ. सोपान शेंडे, इतिहास विभाग प्रमुख, एस. पी. कॉलेज पुणे यांच्या व्याख्यानाचे आयोजन करण्यात आले होते. या व्याख्यानात व्याख्यात्यांनी छत्रपती राजर्षी शाहू महाराज यांच्या जयंतीच्या निमित्ताने त्यांचे विचार आणि कार्य या विषयावर समग्रपने व्याख्यान दिले. छत्रपती राजर्षी शाहू महाराज यांचा जातिभेडविरूद्धचा लढा आणि त्यांचे शैक्षणिक कार्य यामधून सामाजिक न्याय व समता कशी दिसून येते हे त्यांनी अनेक संदर्भ घेद्वन सांगितले. तसेच भविष्यात देखील छत्रपती राजर्षी शाहू महाराज यांच्या विचारांची रूजवात कायम स्वरूपी राहील. असे सांगून त्यांनी छत्रपती राजर्षी शाहू महाराज यांच्या संपूर्ण जीवनाचा आढावा घेद्वन व्याख्यान पूर्ण केले. या कार्यक्रमाचे अध्यक्ष म्हणून महाविद्यालयाचे प्राचार्य डॉ. व्ही.डी. कुलकर्णी उपस्थित होते. तसेच कला विभागाचे राज्यशास्त्र विभाग प्रमुख डॉ. कैलास सोनवणे, डॉ.प्रभाकर जगताप व महाविद्यालयातील विद्यार्थी, शिक्षक व शिक्षकेतर कर्मचारी उपस्थित होते.

8 मार्च ‘‘जागतिक महिला दिन‘‘ निमित्ताने हुतात्मा राजगुरू महाविद्यालयात राज्यशास्त्र विभागाच्या वतीने आयोजित नारी शक्तीचा सन्मान या कार्यक्रमात हुतात्मा राजगुरू महाविद्यालयातील कर्तृत्ववान महिलांचा म्हणजेच नारी शक्तीचा सन्मान प्राचार्य डॉ. संजय शिंदे यांच्या हस्ते करण्यात आला. महाविद्यालयांमधील सर्व विद्या शाखांमधील कर्तृत्ववान महिलांचा महिला दिनाच्या

निमित्ताने सन्मान व्हावा याच उद्देशाने या कार्यक्रमाचे आयोजन राज्यशास्त्र विभागाच्या वतीने करण्यात आले होते. या कार्यक्रम प्रसंगी महाविद्‍यालयाचे प्राचार्य डॉ. संजय शिंदे यांनी महिला दिनाच्या निमित्ताने उपस्थित असलेल्या सर्व महिलांचा संविधान पत्रिका व गुलाब पुष्प देऊन सन्मान केला याप्रसंगी त्यांनी उपस्थित सर्व महिलांना जागतिक महिला दिनाच्या  शुभेच्छा दिल्या. या कार्यक्रमाचे प्रास्ताविक राज्यशास्त्र विभागाचे विभागप्रमुख डॉ. कैलास सोनवणे यांनी केले तर सर्व उपस्थित  मान्यवर व महिलांचे आभार प्रा. हनुमंत देवरे व रसायन शास्त्र विभागात कार्यरत असलेल्या प्रा. स्मिता कोळेकर यांनी  मानले.

14 एप्रिल डॉण् बाबासाहेब आंबेडकर जयंती निमित्त हुतात्मा राजगुरू महाविद्‍यालयात राज्यशास्त्र विभागा अंतर्गत डॉ.बाबासाहेब आंबेडकर आणि भारतीय संविधान या विषयावर सकाळी 10.00 वाजता झूम या प्लॅटफॉर्मवर प्रा. डॉ.सुरेश देवरे राज्यशास्त्र विभाग सोमय्या कॉलेज कोपरगाव यांच्या व्याख्यानाचे आयोजन करण्यात आले होते. या व्याख्यानात त्यांनी डॉ. बाबासाहेब आंबेडकर यांचे भारतीय संविधान निर्मिती मध्ये असणारे योगदान त्यांनी सांगितले. त्याचबरोबर डॉ. बाबासाहेब आंबेडकर यांच्या साहित्य व कृती आणि राज्यघटना या मधून सामाजिक न्याय व समता कशी दिसून येते हे त्यांनी अनेक संदर्भ देऊन सांगितले. तसेच डॉ. बाबासाहेब आंबेडकर यांनी निर्माण केलेले संविधान हे भारतासाठी कशा पद्धतीने वरदान ठरले आहे हे त्यांनी समजावून सांगितलेण् भारतातील लोकशाही व्यवस्था टिकवून ठेवण्यासाठी संविधान काय भूमिका निभावते हे त्यांनी सांगितलेण् डॉ. बाबासाहेब आंबेडकर यांचे विचार हे सतत प्रेरणा देत राहतील हे सांगून डॉ. बाबासाहेब आंबेडकर यांच्या संपूर्ण जीवनाचा आढावा घेतला व व्याख्यान पूर्ण केले. या कार्यक्रमाचे अध्यक्ष म्हणून महाविद्‍यालयाचे प्राचार्य डॉ. कुलकर्णी उपस्थित होते. तसेच कला विभागाचे राज्यशास्त्र विभाग प्रमुख डॉ. कैलास सोनवणे, डॉ. प्रभाकर

जगताप व महाविद्यालयातील विद्यार्थी शिक्षक व शिक्षकेतर कर्मचारी उपस्थित होते.

26 नोव्हेंबर ‘‘संविधान गौरव दिन‘‘ निमित्त हुतात्मा राजगुरू महाविद्यालयात राज्यशास्त्र विभागा अंतर्गत संविधान पत्रिकेचे सामुहिक वाचन करण्यात आले. यानंतर खेड तालुका शिक्षण प्रसारक मंडळाचे अध्यक्ष देवेंद्रजी बुट्टेपाटील व उपाध्यक्ष श्री नानासाहेब टाकळकर यांच्या हस्ते विद्यार्थी, शिक्षक व शिक्षकेतर कर्मचारी यांना 100 संविधान पत्रिकेचे वाटप करण्यात आले. तसेच २६ नोव्हेंबर २००८ रोजी मुंबईमध्ये झालेल्या दहशतवादी हल्ल्यात मृत्युमुखी पाडलेल्या हुतात्म्यांना श्रद्धांजली अर्पण करण्यात आली. भारतीय संविधान हा लोकशाहीचा आदर्श नमूना असूनए जगातील सर्व लोकशाही राष्ट्रांना प्रेरक व दिशादर्शक आहे. विधान गौरव दिन कार्यक्रमात असे प्रतिपादन खेड तालुका शिक्षण प्रसारक मंडळाचे अध्यक्ष देवेंद्र बुट्टेपाटील यांनी केलेण् बुट्टेपाटील म्हणाले भारतीय संविधान फक्त छापील प्रत नसूनए प्रत्येक व्यक्तीला व्यक्तीला केंद्रस्थानी मानून स्वातंत्र्य आणि समतेची महत्ता सांगणारा ऐक जिवंत दस्तावेज आहे. या कार्यक्रमाचे अध्यक्ष म्हणून खेड तालुका शिक्षण प्रसारक मंडळाचे अध्यक्ष देवेंद्रजी बुट्टेपाटील उपाध्याक्ष नानासाहेब टकाळकर, हुतात्मा राजगुरू महाविद्यालयाचे प्राचार्य डॉ. व्ही.डी. कुलकर्णी, उपस्थित होते. तसेच कला विभागाचे उपप्राचार्य डॉ. संजय शिंदे, राज्यशास्त्र विभाग प्रमुख डॉ. कैलास सोनवणे, प्रबंधक श्री. कैलास पाचारणे, डॉ. प्रभाकर जगताप, प्रा. हनुमंत देवरे व महाविद्यालयातील शिक्षक व शिक्षकेतर कर्मचारी उपस्थित होते.

लोकराजा राजर्षी शाहू महाराज स्मृति.शताब्दीश् निमित्त हुतात्मा राजगुरू महाविद्यालयात राज्यशास्त्र विभागाअंतर्गत लोकराजा कृतज्ञता म्हणून 100 सेकंद आदरांजली कार्यक्रमाचे आयोजन करण्यात आले होते. हा कार्यक्रम दिनांक 6 मे 2022

रोजी सकाळी 10.00 वा. महाविद्यालयात संपन्न झाला. सकाळी दहा वाजता राजर्षी शाहू महाराजांच्या प्रतिमेची माननीय प्राचार्य यांच्या हस्ते पूजन झालेत्यानंतर महाविद्यालयातील सर्व स्टाफ व विद्यार्थ्यांनी आहे त्या ठिकाणी 100 सेकंद स्तब्ध उभे राहून लोकराजा ला आदरांजली दिली.

शैक्षणिक वर्ष 2021- 22 मधील तृतीय वर्षाच्या विद्यार्थ्यांचा सदिच्छा ,शुभेच्छा समारंभ महाविद्यालयामध्ये शनिवार दि.9 /7 /2022 या दिवशी विभागात संपन्न झाला. या शुभेच्छा समारंभाच्या निमित्ताने महाविद्यालयाचे प्राचार्य डॉ .शिरीष पिगळे सर व कला शाखेचे उपप्राचार्य डॉ. शिंदे सर यांनी विद्यार्थ्यांना मार्गदर्शन केले .सर्व विद्यार्थ्यांचे कौतुक करून त्यांच्या भावी करिअरच्या अनुषंगाने या दोन्ही मान्यवरांनी मार्गदर्शन केले. त्यानंतर सर्व विद्यार्थ्यांनी आपले मनोगत व्यक्त करून संस्थेविषयी महाविद्यालयाविषयी ऋण व्यक्त केले.




विद्यार्थ्यांना संबोधित करताना खे.ता.शि.प्र. मंडळाचे अध्यक्ष देवेंद्रजी बुट्टेपाटील साहेब




विद्यार्थ्यांना संविधान पत्रिकेचे वाटप करताना खे.ता.शि.प्र. मंडळाचे अध्यक्ष देवेंद्रजी बुट्टेपाटील साहेब




प्रास्ताविक करताना राज्यशास्त्र विभागप्रमुख डॉ. कैलास सोनवणे




संविधान पत्रिकेचे सामूहिक वाचन विद्यार्थी व शिक्षक

**पुढारी**

# भारतीय संविधान जगाला मार्गदर्शक

## ॲड. देवेंद्र बुट्टे पाटील यांचे प्रतिपादन

**राजगुरुनगर : पुढारी वृत्तसेवा**

वैश्विक स्तरावर भारतीय संविधानाचे संवैधानिक महत्त्व सिद्ध झाले असून त्यातील मूल्ये संपूर्ण जगाला मार्गदर्शक असल्याचे प्रतिपादन खेड तालुका शिक्षण प्रसारक मंडळाचे अध्यक्ष ॲड. देवेंद्र बुट्टे पाटील यांनी केले. ते हुतात्मा राजगुरू महाविद्यालयात राज्यशास्त्र विभागाच्या वतीने आयोजित संविधान दिन गौरव कार्यक्रमात बोलत होते.

याप्रसंगी उपाध्यक्ष नानासाहेब टाकळकर, प्राचार्य डॉ. व्ही. डी. कुलकर्णी, साहेबरावजी बुट्टे पाटील महाविद्यालयाचे प्राचार्य डॉ. एच. एम. जरे, उपप्राचार्य डॉ. संजय शिंदे, प्रा. एस. एन. टाकळकर, प्रबंधक कैलास पाचारणे, डॉ. कैलास सोनवणे, तसेच वरिष्ठ व कनिष्ठ महाविद्यालयातील सर्व प्राध्यापक, शिक्षकेतर कर्मचारी व विद्यार्थी उपस्थित होते.

ॲड. देवेंद्र बुट्टे पाटील यांनी बोलताना लोकशाहीचे महान तत्त्वचिंतक असलेल्या डॉ. बाबासाहेब आंबेडकर यांना अभिवादन केले. भारतीय संविधान म्हणजे केवळ शब्द नसून प्रत्येक व्यक्तीला केंद्रस्थानी मानून स्वातंत्र्य आणि समतेची कास धरणारा एक जिवंत दस्तऐवज आहे. यातील स्वातंत्र्य, समता, बंधुत्व, धर्मनिरपेक्षता आणि न्याय ही संवैधानिक मूल्य आत्मसात करून प्रत्येकाने आपल्या जीवनशैलीला आकार देण्याची गरज आहे. संविधानाचा अभ्यास फक्त विद्यार्थ्यांनी नव्हे तर समाजातील सर्व सुजाण नागरिकांनी करण्याची आवश्यकता त्यांनी व्यक्त केली.

यावेळी संविधानातील उद्देशिकेचे सामूहिक वाचन करण्यात आले. २६ नोव्हेंबर २००८ रोजी मुंबईमध्ये झालेल्या दहशतवादी हल्ल्यात मृत्युमुखी पडलेल्या पोलिस आणि नागरिकांना याप्रसंगी श्रद्धांजली अर्पण करण्यात आली. प्रास्ताविक डॉ. कैलास सोनवणे यांनी केले, सूत्रसंचालन रोशन पानमंद यांनी केले, तर आभार डॉ. प्रभाकर जगताप यांनी मानले.

My Gramin Edition
Nov 28, 2021 Page No. 4
newspaper.pudhari.co.in

Daily Local News Paper Pudhari, Dt. 28.112021

**नवराष्ट्र**

# 'संविधानाची मूल्ये जगाला मार्गदर्शक'



**राजगुरूनगर, (वा.)** वैश्विक स्तरावर भारतीय संविधानाचे संविधानिक महत्त्व सिद्ध झाले असून त्यातील मूल्ये संपूर्ण जगाला मार्गदर्शक असल्याचे प्रतिपादन खेड तालुका शिक्षण प्रसारक मंडळाचे अध्यक्ष ॲड. देवेंद्र बुट्टेपाटील यांनी केले. हुतात्मा राजगुरू महाविद्यालयात राज्यशास्त्र विभागाच्या वतीने आयोजित संविधान दिन गौरव कार्यक्रमात ते बोलत होते. नानासाहेब टाकळकर, डॉ. व्ही. डी. कुलकर्णी, डॉ. एच. एम. जरे, डॉ. संजय शिंदे, प्रा. एस. एन. टाकळकर, कैलास पाचारणे, डॉ. कैलास सोनवणे आदींसह विद्यार्थी उपस्थित होते. यावेळी संविघानातील उद्देशिकेचे सामूहिक वाचन करण्यात आले. तसेच २६ नोव्हेंबर २००८ रोजी मुंबईमध्ये झालेल्या दहशतवादी हल्ल्यात मृत्युमुखी पडलेल्या पोलीस आणि नागरिकांना श्रद्धांजली अर्पण करण्यात आली. प्रास्ताविक डॉ. कैलास सोनवणे यांनी, सूत्रसंचालन रोशन पानमंद यांनी तर आभार डॉ. प्रभाकर जगताप यांनी मानले.

Pune Edition
28 November 2021 Page No. 4
epaper.navarashtra.com

Daily Local News Paper Navrashtra, Dt. 28.112021

विभाग प्रमुख, राज्यशास्त्र विभाग
हुतात्मा राजगुरु महाविद्यालय,राजगुरुनगर

डॉ. शिरीष पिंगळे
प्राचार्य
हुतात्मा राजगुरु महाविद्यालय
राजगुरुनगर, ता. खेड, जि. पुणे.